# मुंबई विद्यापीठ

क्र.संलग्नता/आयसीसी/(२०२३—२४)/४५ /२०२४

## परिपत्रक:

**विषय:** व्यवस्थापन व संगणक अनुप्रयोग BBA, BMS & BCA या अभ्यासक्रमांच्या प्रस्तावित नविन संस्थेच्या मान्यते प्रक्रिये संदर्भात अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची अधिसूचने बाबत.

**संदर्भ:** १) AICTE Public Notice for Approval Procress 2024-25
२) Prof. Manish R. Joshi, Secretary, University Grants Commission, Ministry of Educations, Government of India. Letter no. 2-79/2023 (CPP-II) dated 08th January, 2024.
3) कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचा इमेल दिनांक ३ फेब्रुवारी, २०२४

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना सदर परिपत्रकाद्वारे खालील प्रमाणे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४—२५ पासून BBA, BMS & BCA हे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) यांच्या अधिपत्याखाली संलग्नित राहणार असून त्यासंदर्भात विद्यापीठाकडे NOC साठी प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार सद्यस्थितीत ज्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये BBA, BMS & BCA हे अभ्यासक्रम सुरू आहेत त्यांनी Approval Process Handbook 2024-2025 नुसार कार्यवाही करावी.

त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२४—२५ पासून विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना BBA, BMS & BCA हे अभ्यासक्रम नव्याने सुरू करावयाचे असल्यास अशा सर्व महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थाना BBA, BMS & BCA हे अभ्यासक्रम चालविण्यासाठी विद्यापीठाकडून ''ना—हरकत प्रमाणपत्र'' (NOC) घेऊन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) यांचेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक असून तसेच सदर पत्रामध्ये जोडलेले हमीपत्र (Undertaking) विद्यापीठास सादर करणे बंधनकारक आहे.

त्याच प्रमाणे उपरोक्त संदर्भिय क्र. ३ अन्वये AICTE मानकांप्रमाणे आवश्यक असणाऱ्या निकषांच्या पुर्ततेबाबतचा तपशिल संबंधित संस्थेने विद्यापीठाकडे सादर करावा. सदर तपशिलाची विद्यापीठामार्फत खातरजमा करून संबंधित संस्थांचा नाहरकत प्रमाणपत्रा करिता केलेला प्रस्ताव शासनाकडून सादर करण्यात येईल अशी सुचना देण्यात आली आहे.

तरी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) यांच्या Approval Process Handbook 2024-2025 to 2026-27 मधील नियम व अटिंच्या अधिन राहून ज्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांना BBA, BMS & BCA हे संबंधित अभ्यासक्रम नव्याने सुरू करावयाचे असतील त्यांनी वरिल सुचनेनुसार विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करावा. सदर प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल

उपरोक्त बाबतीत मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांनी उपरोक्त परिपत्रकातील सूचनांचे पालन करावे तसेच AICTE मानकांप्रमाणे आवश्यक असणाऱ्या निकषांच्या पुर्ततेबाबतचा तपशिल विद्यापीठाकडे सादर करावा.

मुंबई—४०० ०३२
१५ फेब्रुवारी, २०२४

(प्रा. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना .